मुख्य अभियंता कार्यालय
पाणीपुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका
जा.क्र. ३३६८
दिनांकः ८/८/२०२४

मा.महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

यांजकडेस...

विषय :- पुणे महानगरपालिकेचे सन २०२५-२६ साठीचे वार्षिक पाण्याचे अंदाजपत्रकावर व त्याअनुषंगाने पाटबंधारे विभागास पाठवावयाचे पत्रावर मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांची स्वाक्षरी होणेबाबत.

संदर्भ :- महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिका जा.क्र.म.आ./पा.पु.३२४१ दि.०२/०८/२०२४ अन्वये सादर करण्यात आलेले सन २०२४-२५ साठीचे पाण्याचे अंदाजपत्रक.

सन २०२५-२६ मध्ये पुणे महानगरपालिकेसाठी आवश्यक वार्षिक पाण्याचे अंदाजपत्रक महाराष्ट्र राज्य जलसंपत्ती नियमन प्राधिकरण मुंबई यांचे निर्देशानुसार तयार करण्यात आले असून सोबत जोडणेत आलेले आहे.

सन २०१९ मध्ये पुणे महानगरपालिकेकडून शहराचे हद्दीत आधार नोंदणी व इतर साधनांव्दारे लोकसंख्येची माहिती संकलीत करण्यात आली असून पुणे शहराची लोकसंख्या एकूण ५२,०८,४४४ इतकी निश्चित झाली होती.

संदर्भान्वये सादर करण्यात आलेल्या सन २०२४-२५ च्या पाण्याच्या अंदाजपत्रकामध्ये सन २०१९ च्या जुन्या हद्दीमध्ये लोकसंख्येमध्ये प्रति वर्ष वार्षिक २% वाढ गृहीत धरण्यात आली होती. पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या ११ व २३ गावांची लोकसंख्या मलनि:सारण विभागाच्या DPR नुसार अनुक्रमे ११,१३,२८४ व ६,९८,७९७ गृहीत धरण्यात आली होती. तसेच एकूण लोकसंख्येवर ५% तरंगती लोकसंख्या गृहीत धरून ७९,३९,९७४ इतक्या लोकसंख्येसाठी व ३५ % पाणी गळतीसह मा.महापालिका आयुक्त यांचे स्वाक्षरीसह सन २०२४ - २०२५ साठी एकूण २१.४८ TMC एवढे पाण्याचे अंदाजपत्रक देण्यात आले होते.

पुणे मनपामध्ये नव्याने समाविष्ट ३४ गावांपैकी धायरी, नांदेड, नांदोशी, कोंढवे – धावडे, आंबेगाव खु., उरुळी देवाची, फुरसुंगी, मुंढवा – केशवनगर व मांजरी या गावांमध्ये नजीकच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात पाणीपुरवठा विषयक नेटवर्कची कामे करण्यात आली आहेत. तसेच या बहुतांशी भागामध्ये ड्रेनेजची व्यवस्था सुद्धा उपलब्ध आहे.

३४ गावांच्या लोकसंख्येचा अंदाज बांधण्यासाठी सन २०११ च्या जनगणनेनुसार सल्लागारांमार्फत सखोल अभ्यास करण्यात आला आहे. त्यामध्ये Mathematical calculations for projections, Urban Growth Differential (URGD), Density method, Logistical Curving method, Density mapping method इ. कार्यपद्धतीनुसार तज्ञ सल्लागारांमार्फत त्याचा विस्तृत अहवाल तयार केला असून त्यानुसार ३४ गावांची एकूण लोकसंख्या सन २०२५-२६ करिता १९,१०,५०७ एवढी येत आहे. सदर विस्तृत अहवाल सोबत जोडला आहे. त्यानुसार नव्याने समाविष्ट ३४ गावांपैकी धायरी, नांदेड, नांदोशी, कोंढवे – धावडे, आंबेगाव खु., उरुळी देवाची, फुरसुंगी, मुंढवा – केशवनगर व मांजरी या गावांची लोकसंख्या ८,२९,८५५ येत आहे. या भागासाठी बसविण्यात आलेल्या बल्क मीटर नुसार सरासरी १२० लि. प्रतीमाणसी इतके पाणीपुरवठा करणेत येत आहे.

वरील गावांव्यतिरिक्त उर्वरित गावांसाठी अंदाजित लोकसंख्या १०,८०,६५६ असून या भागासाठी टँकर व अल्प प्रमाणात विकसित असलेल्या पाईपलाईन द्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. या गावांसाठी ७० LPCD प्रमाणे मागणी करण्यात आली आहे. पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये बिगर घरगुती (Commercial) पाणीवापर हा १५० LPCD चे व्यतिरिक्त असल्याने त्याचे प्रत्यक्ष वापराची (सन २०२३-२४) यादी तयार करून पाटबंधारे विभागास सादर केलेली आहे. त्यानुसार पाणीवापर हा २६.५१ MLD आहे.

तसेच MWRRA ऑर्डर क्र.९/२०१७ चे Criteria For Distribution of Surface Water Entitlements By River Basin Agencies For Domestic & Industrial Uses मध्ये अनुज्ञेय असलेले कोणतेही प्रोसेस इंडस्ट्रीज करिता पुणे महानगरपालिकेद्वारे पाणी पुरविले जात नाही. त्यामुळे पुणे महानगरपालिकेचा इंडस्ट्रीयल (औद्योगिक) पाणीवापर ०.०० घ.मी. आहे.

पुणे शहरामध्ये जुन्या हद्दीमध्ये समान पाणीपुरवठा प्रकल्प राबविण्यात येत असून १४१ झोन पैकी ५५ झोनची कामे पूर्ण झालेली आहेत. सदर ५५ झोन मध्ये गळती शोधणे व त्याचे दुरुस्ती करणेची कामे सुरु करण्यात आलेली आहेत. पुणे महानगरपालिकेचे जुने हद्दीमध्ये व नव्याने समाविष्ट झालेल्या ३४ गावांमध्ये ३२% पाणीगळती गृहीत धरली आहे. तसेच पाणी वितरणामध्ये सुसूत्रता आल्याने काही अत्यल्प पाणीपुरवठा होत असलेल्या भागामध्ये उदा. बाणेर, बालेवाडी, पाषाण या भागातील पाणीपुरवठ्यामध्ये वाढ झालेली आहे. तसेच पुणे मनपा हद्दीलगतच्या नव्याने समाविष्ट गावांमधील वितरण व्यवस्थे मध्ये वाढ करून त्यांचे पाणीपुरवठ्यामध्ये वाढ केलेली आहे. तसेच नव्याने समाविष्ट गावासाठी पाईपलाईन नेटवर्क अभावी टँकर संख्येमध्ये सुमारे ४०% ने वाढ करण्यात आली आहे.

पृ-3

वरील बाबींच्या अनुषंगाने सन २०२५-२६ वर्षासाठी आवश्यक २१.०३ TMC पाण्याचे अंदाजपत्रक तयार केले असून सोबत जोडले आहे.

तरी पुणे महानगरपालिकेचे सन २०२५-२६ साठीचे वार्षिक पाण्याचे अंदाजपत्रक पाटबंधारे विभागास सादर करणे बंधनकारक असून त्यांना सादर करावयाचे पत्रावर व पाण्याचे अंदाजपत्रकावर मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांची स्वाक्षरी होणेस विनंती आहे.

मा.स.कळावे,

मुख्य अभियंता
पाणीपुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

07/07/25

7/7/25

मा.अति.महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

यांचेमार्फत सादर ...

पाटबंधारे विभागास, पाण्याचे अंदाजपत्र स्वाक्षरी साठी सादर.

अतिरिक्त महा. आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
आवक क्र. 3८७८ दि. ०८/०७/२५
जावक क्र. 3९०६ दि. ११/०७/२५

10/07/25

एम जे प्रदीप चंद्रन (भाप्रसे)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
आवक क्र. ८७७५ 11 JUL 2025
जावक क्र. 9674 14 AUG 2025

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

मुख्य अभियंता
पाणीपुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका
आवक क्र. ५९८८ दिनांक २१/८/२५

# पुणे महानगरपालि[illegible] सन २०२५-२६ साठी वार्षिक पा[illegible]चे अंदाजपत्रक

| Category | Population | Norm per Capita per day (Ltr) | water Requirement per day | | water Requirement per year | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Liter | ML | MM3 | TMC |
| Domestic water demand - Population category | | | | | | |
| Regular household water supply (population at 1st july 2025 | 5865554 | 150 | 879833100 | 879.83 | 321.139082 | 11.340 |
| Commnunity stand post | 0 | 55 | 0 | 0.00 | 0 | 0.000 |
| water provided through tankers ( Approx 1500 tankers Per Day) | 0 | 55 | 15000000 | 15.00 | 5.475 | 0.193 |
| Village water supply - inside corporation limits | | | | | | |
| A.stand post | 0 | 55 | 0 | 0.00 | 0 | 0.000 |
| B. Piped water supply with sewage System (Dhayri,Nanded ( Excluding Nanded City) ,Nandoshi,kondhawe-Dhawde, Ambegaon (khu.), Uruli Devachi, Fursungi, Mundhawa-Keshawnagar,Manjari) | 829855 | 120 | 99582600 | 99.58 | 36.347649 | 1.283 |
| C. Piped water supply without sewage System (newly added villages other than villeges mentioned in above row) | 1080656 | 70 | 75645920 | 75.65 | 27.6107608 | 0.975 |
| Floating Population | | | | | | |
| floating Population with & without bathing facilities | 388803 | 35 | 13608113.75 | 13.61 | 4.96696152 | 0.175 |
| Total A | 8164868 | | 1083669734 | 1083.67 | 395.539453 | 13.97 |
| Commrcial (For Domestic Purpose) use (Data as per PMC billing system) | | | 25980000 | 26.51 | 9.67615 | 0.342 |
| Industrial Use | 0 | 0 | 0 | 0.00 | 0 | 0.000 |
| Total A,B & C | 8164868 | | 1109649734 | 1110.18 | 405.215603 | 14.31 |
| Add Losses 32 % | | | 522188110 | 522.19 | 190.59866 | 6.73 |
| Total net water Requirement (D+E) | | | 1631837844 | 1631.84 | 595.620813 | 21.03 |
| Annual Demand that can met from recycle | | | | 0.01 | 0.00365 | 0.000 |
| Net Water Requirement for PMC Water Budget 2024-25 (F-G) | | | | 1631.83 | 595.617163 | 21.03 |

नवल किशोर राम
महापालिका आयुक्त पुणे
महानगरपालिका

नि-१

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. मआ/पा.पु/४५४३
दिनांक: १८/८/२०२५

प्रति,
अधिक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ,
सिंचन भवन, मंगळवार पेठ,
पुणे-४११०११

विषय :- पुणे महानगरपालिकेचे सन २०२५-२६ साठीचे वार्षिक पाण्याचे अंदाजपत्रका बाबत.

संदर्भ :- महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिका जा.क्र.म.आ./पा.पु.३२४१ दि.०२/०८/२०२४ अन्वये सादर करण्यात आलेले सन २०२४-२५ साठीचे पाण्याचे अंदाजपत्रक.

सन २०२५-२६ मध्ये पुणे महानगरपालिकेसाठी आवश्यक वार्षिक पाण्याचे अंदाजपत्रक महाराष्ट्र राज्य जलसंपत्ती नियमन प्राधिकरण मुंबई यांचे निर्देशानुसार तयार करण्यात आले असून सोबत जोडणेत आलेले आहे.

सन २०१९ मध्ये पुणे महानगरपालिकेकडून शहराच्या हद्दीत आधार नोंदणी व इतर साधनांव्दारे लोकसंख्येची माहिती संकलीत करण्यात आली असून पुणे शहराची लोकसंख्या एकूण ५२,०८,४४४ इतकी निश्चित झाली होती.

संदर्भान्वये सादर करण्यात आलेल्या सन २०२४-२५ च्या पाण्याच्या अंदाजपत्रकामध्ये सन २०१९ च्या जुन्या हद्दीमध्ये लोकसंख्येमध्ये प्रति वर्ष वार्षिक २% वाढ गृहीत धरण्यात आली होती. पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या ११ व २३ गावांची लोकसंख्या मलनि:सारण विभागाच्या DPR नुसार अनुक्रमे ११,१३,२८४ व ६,९८,७९७ गृहीत धरण्यात आली होती. तसेच एकूण लोकसंख्येवर ५% तरंगती लोकसंख्या गृहीत धरून ७९,३९,९७४ इतक्या लोकसंख्येसाठी व ३५ % पाणी गळतीसह मा.महापालिका आयुक्त यांचे स्वाक्षरीसह सन २०२४ -२०२५ साठी एकूण २१.४८ TMC एवढे पाण्याचे अंदाजपत्रक देण्यात आले होते.

पुणे मनपामध्ये नव्याने समाविष्ट ३४ गावांपैकी धायरी, नांदेड, नांदोशी, कोंढवे - धावडे, आंबेगाव खु., उरुळी देवाची, फुरसुंगी, मुंढवा-केशवनगर व मांजरी या गावांमध्ये नजीकच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात पाणीपुरवठा विषयक नेटवर्कची कामे करण्यात आली आहेत. तसेच या बहुतांशी भागामध्ये ड्रेनेजची व्यवस्था सुद्धा उपलब्ध आहे.

३४ गावांच्या लोकसंख्येचा अंदाज बांधण्यासाठी सन २०११ च्या जनगणनेनुसार सल्लगारांमार्फत सखोल अभ्यास करण्यात आला आहे. त्यामध्ये Mathematical calculations for projections, Urban Growth Differential (URGD), Density method, Logistical Curving method, Density mapping method इ. कार्यपद्धतीनुसार तज्ञ सल्लगारांमार्फत त्याचा विस्तृत अहवाल तयार केला असून त्यानुसार ३४ गावांची एकूण लोकसंख्या सन २०२५-२६ करिता १९,१०,५०७ एवढी येत

आहे. सदर विस्तृत अहवाल सोबत जोडला आहे. त्यानुसार नव्याने समाविष्ट ३४ गावांपैकी धायरी, नांदेड, नांदोशी, कोंढवे - धावडे, आंबेगाव खु., उरुळी देवाची, फुरसुंगी, मुंढवा - केशवनगर व मांजरी या गावांची लोकसंख्या ८,२९,८५५ येत आहे. या भागासाठी बसविण्यात आलेल्या बल्क मीटर नुसार सरासरी १२० लि. प्रतीमाणसी इतके पाणीपुरवठा करणेत येत आहे.

वरील गावांव्यतिरिक्त उर्वरित समाविष्ट गावांसाठी अंदाजित लोकसंख्या १०,८०,६५६ असून या भागासाठी टँकर व अल्प प्रमाणात विकसित असलेल्या पाईपलाईन द्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. या गावांसाठी ७० LPCD प्रमाणे मागणी करण्यात आली आहे. पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये बिगर घरगुती (Commercial) पाणीवापर हा १५० LPCD चे व्यतिरिक्त असल्याने त्याचे प्रत्यक्ष वापराची (सन २०२३-२४) यादी तयार करून पाटबंधारे विभागास यापूर्वी सादर केलेली आहे. त्यानुसार बिगर घरगुती (Commercial) पाणीवापर हा २६.५१ MLD आहे.

तसेच MWRRA ऑर्डर क्र.९/२०१७ चे Criteria For Distribution of Surface Water Entitlements By River Basin Agencies For Domestic & Industrial Uses मध्ये अनुज्ञेय असलेले कोणतेही प्रोसेस इंडस्ट्रीज करिता पुणे महानगरपालिकेद्वारे पाणी पुरविले जात नाही. त्यामुळे पुणे महानगरपालिकेचा इंडस्ट्रीयल (औद्योगिक) पाणीवापर ०.०० घ.मी. आहे.

पुणे शहरामध्ये जुन्या हद्दीमध्ये समान पाणीपुरवठा प्रकल्प राबविण्यात येत असून १४१ झोन पैकी ५५ झोनची कामे पूर्ण झालेली आहेत. सदर ५५ झोन मध्ये गळती शोधणे व त्याचे दुरुस्ती करणेची कामे सुरु करण्यात आलेली आहेत. पुणे महानगरपालिकेचे जुने हद्दीमध्ये व नव्याने समाविष्ट झालेल्या ३४ गावांमध्ये ३२% पाणीगळती गृहीत धरली आहे. तसेच पाणी वितरणामध्ये सुसूत्रता आल्याने काही अत्यल्प पाणीपुरवठा होत असलेल्या भागामध्ये उदा. बाणेर, बालेवाडी, पाषाण या भागातील पाणीपुरवठ्यामध्ये वाढ झालेली आहे. तसेच पुणे मनपा हद्दीलगतच्या नव्याने समाविष्ट गावांमधील वितरण व्यवस्थे मध्ये वाढ करून त्यांचे पाणीपुरवठ्यामध्ये वाढ केलेली आहे. तसेच नव्याने समाविष्ट गावासाठी टँकर संख्येमध्ये सुमारे ४०% ने वाढ करण्यात आली आहे.

वरील बाबींच्या अनुषंगाने सन २०२५-२६ वर्षासाठी आवश्यक २१.०३ TMC पाण्याचे अंदाजपत्रक तयार केले असून सोबत जोडले आहे.

तरी पुणे महानगरपालिकेने सादर केलेल्या जुलै २०२५ ते जून २०२६ चे वार्षिक पाण्याचे अंदाजपत्रकानुसार पुणे शहराचा पाणी कोटा मान्य करण्यात यावा व त्याप्रमाणे पाणी देयके देण्यात यावीत.

कळावे,

नवल किशोर राम
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| | **Water Budget 2025-26** | |
| 1 | **Details of the Entitlement holder (water use Entity)** | |
| | Name of the Entitlement holder | Pune Municipal Corporation |
| | Address of the Entitlement holder | PMC main Building, Congress house road, Shivajinagar, Pune -411005 |
| | Name of the District /city | Pune |
| | Name of the taluka | Pune |
| | Name of the village | Pune |
| | Website of the Entitlement holder | pmc.gov.in |
| | Year of the Establishment of the Entitlement | 15 Feb 1950 |
| | Holder Category* (Rural /peri -Urbun Area /Nagarpanchayats /municipal council-class c/ Municipal council -B /Municipal Population less than 50 lakh )/Metropolitan Center (Polulation equal or more than 50 lakh) integrated Township notified by urban Development Department) | Metropolitan center (Population more than 50 lakhs) |
| 2 | **Details of the Contact person** | |
| | Contact person's Name | Nandakishor Jagtap |
| | Contact person's Designation | Chief Engineer (water supply) |
| | Contact person's postal Address | Water supply Department, PMC Main Building, Shivajinagar, Pune |
| | Contact person's email id | nandkishor.jagtap@punecorporation.org |
| 3 | **Details of the water Source** | |
| | Name of the River Basin Authority | Executive Engineer, Khadakwasala Irrigatation Division<br>Executive Engineer, Chaskaman Irrigation Division<br>khadakwasla, warasgaon, panshet & Temghar Dam, |
| | Name of the supply source /Project | Bhama Aaskhed, Pawana River. |

<table>
<tr><td rowspan="7">4</td><td>Water Lifting Location (Reservoir /Canal)</td><td>Reservoir</td></tr>
<tr><td>Conveyance System from Source to water Treatment Plant (open /piped)</td><td>Piped</td></tr>
<tr><td><u>Details of the water Supply Agreement</u><br>Name of the Authority with which Agreement is made</td><td>Executive Engineer, Khadakwasala Irrigatation Division<br>Executive Engineer, Chaskaman Irrigation Division</td></tr>
<tr><td>Agreement period years</td><td>6 Years</td></tr>
<tr><td colspan="2"><table>
<tr><td></td><td>For Khadakwasala Dam</td><td>For Bhama Aaskhed Dam</td></tr>
<tr><td>Start Date of the Agreement (dd/mm/yyy)</td><td>1/3/2020</td><td>9/12/2020</td></tr>
<tr><td>End of the Agreement (dd/mm/yyy)</td><td>28/2/2026</td><td>8/12/2026</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>Water Reservation<br>Domestic (TMC)</td><td><table>
<tr><td>Dam/Reservoir</td><td>TMC</td></tr>
<tr><td>Khadakwasala Dam</td><td>12.932</td></tr>
<tr><td>Bhama Aaskhed Dam</td><td>2.672</td></tr>
<tr><td>Pawana River</td><td>0.334</td></tr>
<tr><td>Pawana River (For 34 Villages added in PMC)</td><td>0.342</td></tr>
<tr><td>Bhima River (For 34 Villages added in PMC)</td><td>0.083</td></tr>
<tr><td>Total</td><td>16.36</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>commercial (Domestic Use)</td><td>NIL</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | Others (TMC) (Please specify and enclose certified documents) | NIL |
| | Total (TMC) | 16.36 TMC |
| | Name of Approving Authority | Irrigation Department, State Government of Maharashtra |
| | Date of Approval | 2/3/2020 (For Khadakwasala Dam), 9/12/2020 ( For Bhama Aaskhed Dam) |
| 5 | **Details of the metering System for Raw Water** | |
| | Whether Metering System for Raw Water is available ? (yes/No) | Yes |
| | If yes, Ownership of the flow meter (Water Resources Department /Local Body) | Pune Municipal Corporation |
| | Custody of the flow meter ( water Resources Departbment/ Local Body ) | Pune Municipal Corporation |
| | Custody of the Logbook ( water Resources Departbment/ Local Body ) | Both Pune Municipal Corporation and Irrigation Dept. |
| | Type of Flow Meter*** (Ultasonic preferably SCADA based /Magnetic ) | Full bore Electromagnetic |
| | Flow Meter (working /Non Working ) | Working |
| | Last Calibration Date (dd/mm/yyy) | 9/9/2020 |
| 6 | **Details of the Sewage Treatment Plant** | |
| | a) Total installed capacity of sewage Treatment plant (MLD) | 477 MLD |
| | b) Quantity of sewage generated (MLD) | 980 MLD |
| | c) Quantity of sewage collected (MLD) | 477 MLD |
| | d) Quantity of sewage actually being treated (MLD) | 477 MLD |

| | | |
|---|---|---|
| | e) Quantity of treated water being made available for agricultural Use (MLD) | 504 MLD |
| | f) Quntity of treated water being reused other than Agricultural Use (MLD) | 0.5 MLD |
| | g) Under Construction sewage Treatment Plant Capacity, if any (MLD) | 1) 418.00 MLD capacity STPs under execution & will be commissioned by end of December 2025.<br>2) 82 MLD planned and will be executed soon.<br>3) 89 MLD proposed Augmentation of existing STP's under Amrut 2.0. |
| | h) Proposed Date of commissioning under Construction sewage Treatment Plant (dd/mm/yyy) | |
| | i) Whether time bound plan of proposed sewage treatment plant is submitted? IF Yes, give reference | Yes, The Project is Funded Through JICA, Amrut -2.0 |
| 7 | **Details of the Bulk water Audit**<br>a) When the last Audit is done by Auditor, water & Irrigation Maharashtra state ? (dd/mm/yyy) | Water audit not done |
| | b) Whether water Audit Report copy is submitted to River Basin Agency (Yes/No) | No |
| | c) Whether water Audit Report copy is submitted to MWRRA (Yes/No) | No |
| 8 | **Details of the Population**<br>Population as per last Census | 31,24,458 (as per 2011 census) |
| | Current year Extrapolated population (Annual Growth rate 2 % ) or population for current year(as per other certified document) | 8164868 as on 1 july 2025 |
| | population using water supply through water tankers** | 15.00 M.ltr /Day (1500 tankers/Day) |
| | Population using water supply through public stand post** | NIL |
| | Population using piped water supply without sewage system** | 1080656 |

| | | |
|---|---|---|
| | Population using piped water supply with sewage system** | 66,95,409 |
| | Floating population with bathing facilities Floating | Floating population With Bathing facility 388803 |
| | Floating population without bathing facilities | Nil |
| | **Details of the Demand** | |
| | a) For Rural water supply Scheme | NIL |
| | b) For Urban Local Body's water supply Scheme | |
| | i. water tankers | 15.00 MLD |
| | ii public stand post | 0.00 MLD |
| | iii piped water supply without sewage system | 75.65 MLD |
| | iv piped water supply with sewage system as per norms | 979.41 MLD |
| 9 | sub total | 1070.06 MLD |
| | c) For water supply scheme of Integrated township projects/ township in hill development department | NIL |
| | d) For all water supply schemes | |
| | i) Floating population with bathing facilities | 13.61MLD |
| | ii) Floating population without bathing facilities | Nil |
| | sub total | 1083.67 |
| | e) Commercial (Domestic Use) | 26.51 MLD |
| | Total daily water demand ML | 1110.18 MLD |

| | | |
|---|---|---|
| | yearly water demand ML | 405215.603 ML |
| | yearly water demand (Mcum) | 405.215 (Mcum) |
| 10 | **Details of the water supply Augmentation From Alternative sources.** | |
| | i) Demand that be met from Groundwater Annual Demand that can be met from open well ( ML ) | Not assessed |
| | ii) Annual Demand that can be met from Tube Bore well ( ML ) | Not assessed |
| | iii) Total Annual Demand that can be met from Groundwater ( ML ) | Not assessed |
| | iv) Annual Demand that can be met From Rainwater Harvesting ( ML ) | Not assessed |
| | v)Annual Demand that can be met From Recycled water ( ML ) | 3.65 ML |
| | vi) Annual Water Quantity From other Sources (please specify ) (Mcum) | NIL |
| | Total Annual water supply augmentation from alternative sources (Mcum) | 0.003 Mcum |
| 11 | Net Annual water Demand | 405215.603ML |
| 12 | Un accounted for water Quantity 32 % | 190598.66ML |
| 13 | Fresh water Demand (ML) | 595617.163 ML |

(नवल किशोर राम)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका